# वर्धा जिल्हा पोलीस वार्तापत्र

**दिनांक : 18.11.2018**

## पो.स्टे. रामनगर येथील जबरी चोरीचा गुन्हा उघड

हकीकत या प्रमाणे आहे की, दिनांक 14.10.2018 चे रात्री 10.50 ते 11.00 वा. दरम्यान यातील फिर्यादी कु. दिपाली विलासराव ठाकरे, वय 22 वर्ष, रा. नागरमोते यांचे घरी, साई नगर, वर्धा ही तीच्या मैत्रीणींसह वर्धा शहरातील दुर्गादेवी बघुन पायदळ घरी जात असतांना जगजीवन शाळेसमोर सार्वजनिक रोडवर अज्ञात दोन 20 ते 22 वयोगटातील इसमांनी टूव्हीलरने यांचे पाठीमागून येवुन रात्रीला अंधाराचा व रस्त्यावरील लोकांची वर्दळ नसल्याचा फायदा घेवुन फिर्यादीचे हातात असलेला सॅमसंग जे 7 मोबाईल काळया रंगाचा 10900/–रू. चा बळजबरीने हिसकावुन घेतला व पळुन गेले फिर्यादीचे तोंडी तक्रीवरून पो.स्टे. रामनगर येथे अप.क्र. 777/2018 कलम 392, 34 भादविचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

गुन्हयाची गंभीरता लक्षात घेवून मा. पोलीस अधिक्षक सा. व मा. अपर पोलीस अधिक्षक सा. यांनी सदर गुन्हयाचा दाखल तारखेपासूनच पाठपूरावा केला व गुन्हयातील आरोपी शोधाकरीता स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांना वेळोवेळी मार्गदर्शन केले.

सदर गुन्हयाचा स्थानिक गुन्हे शाखेतर्फे संमातर तपास करण्यात येत असून सराईत गुन्हेगार चेक करण्यात येत होते तसेच गोपनिय बातमीदार लावण्यात आले होते. यातच दिनांक 17.11.2018 रोजी स्था.गु.शा.चे पथकाला सदर गुन्हयातील आरोपीसंबंधाने मिळालेल्या गोपनीय व खात्रीशीर बातमीवरून संशयीत इसम अनिकेत मुन, रा. झाडगांव यांस ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्याने सदरचा गुन्हा त्याचे साथीदारासह केल्याचे कबूल केले गुन्हयातील मुद्येमाल व वापरलेले वाहनाबाबत माहिती दिली. वरून गुन्हयात अनिकेत बबनराव मुन, वय 19 वर्षे, रा. झाडगांव (बेलगांव), पो.स्टे. सावंगी ता.जि. वर्धा + 1 विधीसंघर्षीत बालक यांस अटक करण्यात आली असून त्यांचेकडून सॅमसंग जे 7 मोबाईल कि. 10,900/–रू व हिरोहोंडा पॅशन क्रमांक एमएच–32/ए.सी. 4715 कि. 50,000/–रू असा जू.कि. 60,900/–रू चा माल जप्त करण्यात आला. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन रामनगर तर्फे करण्यात येत आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधिक्षक डॉ. श्री. बसवराज तेली, व मा. प्रभारी पोलीस अधिक्षक श्री. निखील पिंगळे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. निलेश ब्राम्हणे, स्थानिक गुन्हे शाखा, वर्धा यांचे निर्देशांप्रमाणे पो.उप.नि. महेंद्र इंगळे, आशीष मोरखडे, पो.हवा. निरंजन वरभे, ना.पो.शि. तुषार भूते, पो.शि. राकेश आष्टनकर, चालक ना.पो.शि. आत्माराम, मुकेश, तसेच सायबर सेलचे ना.पो.शि. दिनेश बोथकर, कुलदीप टांकसाळे, निलेश कट्टोजवार, अभिजीत वाघमारे, अनूप कावळे, अक्षय राऊत यांनी केली.